लग्न म्हणजे बस्ता बस्ता म्हणजे राजेन्द्र
१९५९ पासून राजेन्द्र
मेन रोड, संगमनेर. फोन : 02425 - 225740, मोबा : 7901031155

संगमनेर । अकोले । कोपरगाव । राहाता । श्रीरामपूर । राहुरी । नेवासा । शेवगाव येथून एकाच वेळी प्रसिध्द..
बांधिलकी जनहिताची
# नायक
सायं.दैनिक
संपादक : गोरक्षनाथ मदने
कार्यकारी संपादक : श्याम तिवारी

हरिचंद टेक्सटाईल्स मार्केट
। एथनिक वेअर । बस्त्यासाठी खास सोय
। नामांकित कंपन्यांचे सुटींग शर्टींग । होलसेल साडी डेपो
आम्ही जपतो तुमचा विश्वास..!
मार्केट यार्ड जवळ, नाशिक-पुणे हायवे, संगमनेर ,7972842036

Sangamner । MAHMAR/2018/75654 । वर्ष ८ । अंक ३४ । ६/६/२०२५ (दैनिक) । किंमत रु.२/- । पाने ४

आला रे आला राजपाल सेल आला..!
स्मार्ट असो वा मार्ट.. मिल असो वा मॉल.. सर्वात स्वस्त देणार फक्त राजपाल !
30 ते 70% डिस्काउंट सेल
विश्वसनीय वस्त्रांची अखंड परंपरा
राजपाल
संगमनेर (02425) 222226
अ. नगर (0241) 2999299
नारायणगाव (02132) 242132
श्रीरामपूर (02422) 220090

कोथमिरे मसाले SINCE 1992
स्वाद, स्वास्थ्य, सर्वांगसुंदर मसाले सारे, चवीला खरे कोथमिरे मसाले !
सन १९९२ पासून ग्राहकांच्या पसंतीस उतरलेले मसाले
चवीला खरे कोथमिरे!
+91 9370584332
www.kothmiremasale.com

## लग्नाचे आमिष दाखवून अल्पवयीन मुलीवर अत्याचार

**संगमनेर तालुक्यातील प्रकार**

**गुन्हा दाखल होताच आरोपी पसार**

**नायक वृत्तसेवा, संगमनेर**

वर्षभरापूर्वीच गावात राहण्यासाठी आलेल्या तरुणाने दररोज संगमनेरला शिक्षणासाठी जाणाऱ्या अल्पवयीन मुलीला हेरुन तिला प्रेमाच्या जाळ्यात ओढले. त्यानंतर वारंवार लग्नाचे आमिष दाखवून वर्षभरात दोनवेळा संगमनेर बसस्थानकातून पुन्हा गावाकडे घरी नेवून तिच्याशी बळजबरीने शारीरिक (पान ३ वर)

■ अलिकडच्या काळात शाळा, महाविद्यालयाच्या निमित्ताने घराबाहेर पडणारी अनेक मुलं निर्जन ठिकाणी, हॉटेल अथवा लॉजमध्ये सापडण्याचे प्रकार वाढले आहेत. संगमनेरातही हा प्रकार मोठ्या प्रमाणात फोफावला असून बसस्थानकाच्या परिसरातील काही लॉजसह आजूबाजूच्या काही ठिकाणी मोठी रक्कम घेवून खोल्या उपलब्ध करुन देण्याचे प्रकारही वाढीस लागले आहेत. या प्रकारांची पोलिसांसह पालकांनीही गांभीर्याने नोंद घेवून घरातून शिक्षणासाठी निघालेला पाल्य खरोखरी शिक्षणासाठीच जातोय की अन्य कशासाठी याची वेळोवेळी पडताळणी करण्याची गरज निर्माण झाली आहे.



## वीज कंपनीला 'त्या' फांद्या हटवण्याची उपरती

**दैनिक नायकच्या वृत्ताचा परिणाम**

**वृत्तीत बदल होण्याची गरज**

**नायक वृत्तसेवा, संगमनेर**

■ वृक्षारोपण आणि संवर्धन ही काळाची गरज आहे. केंद्र व राज्य सरकारांसह स्थानिक स्वराज्य संस्थांच्या पातळीवरही त्यासाठी खूप व्यापक प्रमाणात काम सुरु आहे. जनजागृतीतून सर्वसामान्यांचा सहभागही वाढत असल्याने वृक्षारोपण चळवळ म्हणून उभी राहत आहे. अशावेळी वीज मंडळाकडून दरवर्षी दाखवला जाणारा असंवेदनशीलपणा नागरीकांच्या रोषाचे कारण ठरत असून वीज कंपनीने झाडे छाटण्याला अन्य पर्याय शोधण्याची व वृक्षसंवर्धनाच्या वैश्विक मोहीमेत सहभागी होण्याची गरज आहे. अन्यथा भविष्यात कंपनीची अवस्था 'भीक नको, पण कुत्रं आवर' अशी होण्याची दाट शक्यता आहे.

हरितसृष्टी, माझी वसुंधरा, हरित शहरं अशा कितीतरी वाक्यांचा प्रयोग करुन एकीकडे नागरिकांमधील पर्यावरणाच्या जाणीवा जागवल्या जात असताना दुसरीकडे नेहमीच त्रासदायक ठरणाऱ्या वीज कंपनीकडून मात्र या मोहीमेलाच हरताळ फासण्याचा प्रकार सुरु आहे. सामाजिक उपक्रमात नेहमीच पीछाडलेल्या या कंपनीकडून विद्युत वाहिन्यांना अडथळा ठरत असल्याची कारणं सांगत दरवर्षी शहरातील रस्त्यारस्त्यावर आणि गल्लीबोळात लावलेल्या झाडांवर कुऱ्हाड फिरवली जाते. धक्कादायक म्हणजे त्यासाठी नियुक्त केला जाणारा कथीत लाकूडतोड्या आडहत्यारी पद्धतीने झाडांची छाटणी करुन छाटलेल्या फांद्या रस्त्यावरच सोडून देत असल्याने पर्यावरणासह सर्वसामान्यांनाही त्याचा फटका बसत आहे. दरवर्षी घडणाऱ्या या प्रकाराबाबत वीज कंपनीच्या अधिकाऱ्यांना कोणतेही सोयरसुतक नसल्याने (पान ३ वर)

### महत्त्वाचे

**सोन्याच्या किंमतीत सलग पाचव्या दिवशी मोठी वाढ!**

जळगाव : २४ कॅरेट शुद्ध सोन्याची किंमत पुन्हा एकदा लाखाच्या जवळ पोहोचली आहे. आज सलग पाचव्या दिवशी सोन्याच्या किंमतीत वाढ झाली आहे. खरे तर गेल्या काही दिवसांपासून सोन्याच्या किंमतीत सातत्याने वाढ होत आहे. आज सलग पाचव्या दिवशी सोन्याच्या किंमतीत वाढ नमूद करण्यात आली आहे.पाच दिवसांपूर्वी अर्थातच १ जून २०२५ रोजी २४ कॅरेट शुद्ध सोन्याची किंमत ९७ हजार ३१० रुपये प्रति १० ग्रॅम एवढी होती. २ जून रोजी हीच किंमत ९८ हजार ८४० रुपयांवर पोहोचली, म्हणजे सोन्याच्या किंमतीत दहा ग्रॅम मध्ये १५३० रुपयांची वाढ झाली.

## 'अगस्ती' बाबत नेहमी सहकार्याची भूमिका राहील : आ.डॉ. लहामटे



**नायक वृत्तसेवा, अकोले**

अगस्ती सहकारी साखर कारखान्याबाबत आरोप प्रत्यारोप होत राहतील, ते तथ्यहीन आहेत. शेतकऱ्यांबरोबरच कामगारांचे मोठे कष्ट व योगदान कारखान्यासाठी आहे, हे नाकारता येणार नाही. अगस्ती कारखाना बंद पडू दिला जाणार नाही. अगस्ती बंद पडला तर मोठे दृष्टचक्र निर्माण होईल. सत्ता असो वा नसो, कारखान्याबाबत सातत्याने सहकार्याची भूमिका राहील असा विश्वास आमदार डॉ. किरण लहामटे यांनी दिला.

अगस्ती कार्यस्थळावर कारखान्याच्या (पान ३ वर)

## उत्पादन वाढीसाठी ए आय तंत्रज्ञानाचा वापर करणार : थोरात

**नायक वृत्तसेवा, संगमनेर**

ऊस शाश्वत पीक असून एकरी उत्पादन वाढीसाठी आगामी काळात नवीन ए आय तंत्रज्ञानाचा वापर करणार आहोत. संगमनेर तालुका हे कुटुंब असून यश मिळवण्यासाठी कष्ट हे (पान ३ वर)

■ यावर्षी कार्यक्षेत्रामध्ये कमी ऊस असल्याने आव्हान मोठे आहे. चांगला भाव देण्यासाठी कार्यक्षेत्रात जास्त ऊस उत्पादन होणे गरजेचे आहे. कारखान्याने ऊस उत्पादन वाढीकरता विविध अनुदान योजना सुरू केल्या असून सेंद्रिय खत सुद्धा उपलब्ध आहे. आगामी गाळपाच्या पूर्वतयारीच्या दृष्टीने मशीनचे ओव्हर ऑइलिंगची सर्व कामे, ऊस तोडणी, वाहतूक, मजूर ही सर्व कामे योग्य वेळेत पूर्ण करू असे कार्यकारी संचालक जगन्नाथ घुगरकर यावेळी म्हणाले.




## संगमनेर-अकोलेचे पक्के व सख्खे नाते ठेवू : आ.खताळ



**नायक वृत्तसेवा, अकोले**

अकोले तालुक्याचा पाण्याच्या बाबतीत त्याग आहे, याची जाणिव कायम आहे. संगमनेरच्या पठार भागातील पाणी प्रश्नावर जिल्ह्याचे पालकमंत्री तथा जलसंपदा मंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील यांच्याशी चर्चा करुन प्रश्न मार्गी लावु तसेच यासाठी आ. डॉ. लहामटे यांच्याशीही संपर्क झाला, दोघे मिळून प्रश्न मार्गी लावु. हक्काचे पाणी पळवण्याचा कोणताही विचार नाही असे स्पष्ट करत पूर्वीच्या आमदारांसारखे केवळ नावापुरते छोटा भाऊ व मोठा (पान ३ वर)

## व्यापाऱ्याचे अपहरण करून लुटणारे गजाआड!

**एलसीबीने संभाजीनगर येथून आवळल्या मुसक्या**



**नायक वृत्तसेवा, अहिल्यानगर**

जिल्ह्यातील पाथर्डी तालुक्यातील तिसगाव येथे अवैध कत्तलखान्याची माहिती देण्यावरून व्यापाऱ्याचे अपहरण करून लुटण्याच्या गुन्ह्यातील दोन मुख्य आरोपींना छत्रपती संभाजीनगर येथून जेरबंद करण्यात स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाला यश आले.

दि. २९ मे रोजी फिर्यादी भारत देविदास निफारे (वय ३९, धंदा व्यापार, रा. नाथनगर, पाथर्डी, जि. अहिल्यानगर) हे अहिल्यानगर येथून पाथर्डीकडे जात असताना त्यांच्या मित्राने त्यांना सांगितले की, तिसगाव येथे कत्तलीसाठी गोवंशीय जनावरे येत आहेत. त्यामुळे फिर्यादी हे तिसगाव येथे थांबले असताना, गुन्ह्यांतील आरोपींनी फिर्यादीस उचलून रविवार पेठ, तिसगाव येथे नेऊन मारहाण करून गळ्यातील सोन्याची चैन काढुन घेऊन जीवे मारण्याची धमकी दिली. याबाबत पाथर्डी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल आहे. सदरचा गुन्हा दाखल झाले पासुन (पान ३ वर)

NATURE EARTH
RESTAURANT & AGRO RESORT
Kolhewadi Phata, Behind Shetkari Agro Clinic, Vadgaon Pan, Sangamner, Dist. A. Nagar
natureagroresort@gmail.com / www.natureagroresort.com 88 477 88 099 / 89 75 40 82 85
CONFERENCE HOLL | RESTAURANT | ROOMS | CONFERENCE PAD

आपुलकीने यावे विश्वासाने न्यावे
ओम मयूर ज्वेलर्स
आमचे ध्येय
सर्व मानवी सुखद जीवनात सुवर्ण आनंद आणि उत्सव प्रदान करणे.
सर्व मानवाच्या संपत्तीत सोने व चांदीच्या स्वरुपात वाढ करणे.
अधिक माहिती साठी संपर्क
अशोक चौक, संगमनेर, जि. अ.नगर 422 605 फोन : 02425 225924 | मो.: 93720 12044

चैतन्य हॉस्पिटल (डॉ.जठार)
ताजणे मळा, डॉ.नागरे हॉस्पिटल समोर नवीन नगर रोड, संगमनेर
फोन : (02425)-221632 / 224761 / 7038170382
सर्व इन्शुरन्स कंपन्यांचे कॅशलेस सुविधा उपलब्ध
(फक्त कॅशलेससाठी संपर्क नंबर - 7038170332)
कॅन्सरवरील सर्वोत्तम उपचार आता जठार हॉस्पिटलमध्ये देखील..
डॉ.अश्विनी नागरगोजे
(रेडिएशन ऑनकोलॉजिस्ट)
प्रत्येक महिन्याच्या पहिल्या मंगळवारी
- अपॉईन्टमेंट संपर्क -
9272091471/ 9767798440
लक्षणे :
● सातत्याने येणारा खोकला ● पोटात दुखणे ● भूक न लागणे
● रक्तस्राव ● रक्ताच्या गाठी येणे ● अनावश्यक वजनातील घट
● छातीत दुखणे ● थकवा ● गाठ येणे ● श्वासोच्छासातील अडथळा
वरील लक्षणे असल्यास संगमनेर येथील
जठार हॉस्पिटलमधील आमच्या तज्ञांचा सल्ला घ्या
प्रगत तंत्रज्ञान, अत्याधुनिक सोयी सुविधा आणि सर्वोत्कृष्ट डॉक्टरांची टिम

भंडारी क्लॉथ सेंटर सिल्क अँण्ड सारीज
• शेरवाणी • पैठणी • प्युअरसिल्क
• कुर्तापायजमा • घागरा • डिजायनर सारीज्
• ब्लेजरसुट • शालू • वनपीस
• इंडोवेस्टन • कांजीवरम • क्रॉप टॉप
• पॅन्ट-शर्ट
क्षण क्षणांभात शोभा वाढवणारी वस्त्रसंपदा !
लग्नबस्त्यासाठी खास व्यवस्था
शहरातले पहिले संपूर्ण ए.सी. शोरुम
मेनरोड कॉर्नर, 02425 225719
बाजारपेठ, संगमनेर

सुविचार : जी गोष्ट स्वीकारार्ह आहे ती करण्यापेक्षा जी बरोबर आहे ती करा– फ्रान्झ काफ्का

# 'विराट' विजय

जगातील सर्वात मोठी क्रिकेट फ्रँचाइजी असलेल्या 'आयपीएल'च्या २०२५च्या हंगामाचे विजेतेपद रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूने मिळवले. गेली १८ वर्षे या संघाचे निष्ठेने प्रतिनिधित्व करणारा क्रिकेटपटू विराट कोहली याच्या निष्ठेचाही विजय झाला आहे, असे म्हणावे लागेल. गेल्या सुमारे दोन दशकांच्या कालावधीमध्ये भारतीय क्रिकेटचा अविभाज्य भाग असलेल्या विराट कोहलीने भारतीय संघाचे प्रतिनिधित्व करत असताना कसोटी क्रिकेट, एकदिवसीय क्रिकेट किंवा टी–२० क्रिकेटमध्ये अनेक अविस्मरणीय विजय मिळवून दिले होते. पण भारतामध्ये जेव्हा फ्रँचाइजी क्रिकेटला सुरुवात झाली तेव्हा अगदी लहान वयात विराट कोहलीने बंगळुरू संघाचा हात पकडला. गेल्या अठरा वर्षांच्या कालावधीमध्ये आयपीएलमध्ये अनेक चढउतार होऊनही विराट कोहलीने बेंगळुरूचा हात कधीही सोडला नाही. या संघाला एकदा तरी आयपीएलचे विजेतेपद मिळावे अशी त्याची इच्छा होती. गेल्या अठरा वर्षांच्या कालावधीमध्ये अनेक वेळा उपांत्य फेरीत किंवा अंतिम फेरीत धडक मारूनही बेंगळुरूला चषकावर नाव कोरता आले नव्हते. विराट कोहली बेंगळुरू संघाचा कर्णधार असतानासुद्धा त्याला ही कामगिरी करता आली नव्हती. पण आता रजत पाटीदारच्या नेतृत्वाखाली खेळताना बेंगळुरू संघाने अंतिम फेरीमध्ये पंजाबसारख्या बलाढ्य संघाला धूळ चारून अखेर ट्रॉफीवर नाव कोरले आणि विराट कोहलीच्या स्वप्नाची पूर्तता झाली. सर्वसाधारणपणे मैदानामध्ये ठामपणे वावरणारा आणि आपल्या भावनांवर नियंत्रण ठेवणारा विराट कोहली या अंतिम सामन्यामध्ये मात्र मुक्तपणे आपल्या भावनांना वाट करून देताना दिसला. सहसा त्याच्या डोळ्यात कधीही अश्रू येत नाहीत. पण बेंगळुरू सामना जिंकणार याची जाणीव झाल्यावर मात्र त्याला आपल्या भावना आवरता आल्या नाहीत. तब्बल दीड दशके ज्या स्वप्नाची वाट पाहात होतो ते समोर पूर्ण होताना दिसत असल्याने विराटसारख्या खेळाडूलासुद्धा अश्रू आवरले नाहीत. भारताला टी–२० विश्वचषक मिळवून देण्यामध्ये आणि गेल्या वर्षी चॅम्पियन ट्रॉफीमध्येसुद्धा विजेतेपद मिळवून देण्यामध्ये महत्त्वाची भूमिका बजावणार्या विराट कोहलीने आयपीएलसारख्या व्यावसायिक फ्रँचाइजी क्रिकेटमध्येसुद्धा आपल्या संघाचे निष्ठेने प्रतिनिधित्व केल्यामुळेच बेंगळुरूच्या या विजयाचे महत्त्व वेगळे आहे. आयपीएलमध्ये जे विविध संघ आहेत त्या संघांची रचना नेहमीच बदलत असते. लिलावाच्या माध्यमातून खेळाडूंची खरेदी–विक्री होत असल्यामुळे इतर संघातील चांगले खेळाडू आपल्याकडे ओढून घेण्याचा सर्वच संघ मालकांचा कल असतो. पंजाब संघाचे नेतृत्व करणार्या श्रेयस अय्यरने आतापर्यंत तीन वेळा तीन वेगवेगळ्या संघांच्या माध्यमातून आयपीएल क्रिकेट खेळताना अंतिम फेरीत प्रवेश केला आहे. मुंबईचा रोहित शर्मासुद्धा सुरुवातीला डेक्कन चार्जर्सतर्फे खेळत होता. चेन्नई सुपर किंगचा महेंद्रसिंग धोनीलासुद्धा दोन वर्षे बंदीच्या कालावधीमध्ये पुणे वॉरियर्सकडून खेळावे लागले होते. ऋषभ पंत, शुभमन गिल, के. एल. राहुल किंवा असे अनेक स्टार खेळाडू आयपीएलच्या विविध संघांच्यातर्फे आतापर्यंत खेळले आहेत. पण विराट कोहली हा असा खेळाडू आहे ज्याने गेल्या १८ वर्षांच्या कालावधीमध्ये एकदाही संघ बदलला नाही. या परिस्थितीमध्ये या संघाबद्दल वेगळ्या प्रकारची भावना निर्माण होणे आणि या संघाला विजेतेपद मिळवून देणे हे विराटचे स्वप्न असणे साहजिकच होते. आंतरराष्ट्रीय पातळीवरील अनेक गुणी खेळाडूंचा सहभाग या संघामध्ये असूनही बेंगळुरू संघाला ट्रॉफी जिंकता येत नाही, म्हणून त्यांची चेष्टाही केली जात होती. पण आता विराट कोहलीच्या करिअरचाही शेवटचा टप्पा समोर दिसत असताना बेंगळुरू संघाने आयपीएल चषक जिंकून विराटला एक वेगळ्या प्रकारचा सन्मान दिला आहे, असे म्हणावे लागेल. चेन्नई, मुंबई किंवा कोलकाता या संघांनी ही ट्रॉफी अनेक वेळा जिंकली होती. अनेक वेळा स्पर्धा सुरू होण्यापूर्वी या संघांकडे दावेदार म्हणून पाहिले जात होते. पण बेंगळुरू संघाकडे कधीच त्या दृष्टिकोनातून पाहिले जात नव्हते. २०२५चा हंगाम सुरू होण्यापूर्वीसुद्धा बेंगळुरू हा विजेता असेल असे कोणालाही वाटत नव्हते. पण अखेर बेंगळुरूला पहिल्यांदाच विजेतेपद मिळाले. अंतिम सामन्याचा निकाल लागल्यानंतर देशाच्या कानाकोपर्यात मोठ्या प्रमाणात फटाक्यांची आतषबाजी करण्यात आली. अशा प्रकारचा प्रतिसाद आतापर्यंत फक्त मुंबईला मिळाला होता. राष्ट्रीय संघाने एखादी मोठी स्पर्धा जिंकल्यानंतर ज्या प्रकारे सेलिब्रेशन केले जाते तशाच प्रकारचा उत्साह बेंगळुरूने आयपीएल ट्रॉफी जिंकल्यानंतर चाहत्यांनी दाखवला. आयपीएलसारख्या टी२० क्रिकेट स्पर्धा व्यावसायिक स्पर्धा असतात त्यामुळे या स्पर्धेमधील विजेतेपदाला कितपत महत्त्व द्यायचं हा जरी वादाचा मुद्दा असला तरी यात खेळणार्या विविध संघांमध्ये भारतीय संघातील विद्यमान खेळाडू किंवा उदयोन्मुख खेळाडूच प्रतिनिधित्व करत असतात. आयपीएलच्या माध्यमातूनच भारतीय क्रिकेट संघाला अनेक हिरे गवसले आहेत. भारतीय खेळाडूंची स्पर्धात्मकता वाढली आहे. धोनी, रोहित शर्मा, विराट कोहली यांच्यासारखे खेळाडू राष्ट्रीय क्रिकेटमध्ये निवृत्त झाल्यावर आयपीएलमध्ये आपला करिश्मा दाखवू शकतात. म्हणून आयपीएलसारखे फ्रँचाइजी क्रिकेट महत्त्वाचे आहे. विराट कोहलीसारख्या खेळाडूंना त्यांच्या एकनिष्ठतेचे फळ विजेतेपदाच्या माध्यमातून मिळते तेव्हा हे महत्त्व तीव्रतेने अधोरेखित होते.

# ऑनलाइन प्रणालीचा वापर करून नियमित वीज बिल भरा : खैरनार

**नायक वृत्तसेवा, संगमनेर**

ग्राहकांनी नियमित वीज देयक ऑनलाइन प्रणालीचा वापर करून नियमित भरावे असे आवाहन उपकार्यकारी अभियंता धनंजय खैरनार यांनी संगमनेर शहर उपविभागाच्या वतीने आयोजित लकी डिजिटल ग्राहक योजनेच्या दुसऱ्या फेरीतील विजेत्या ग्राहकांना बक्षीस वितरण कार्यक्रम प्रसंगी केले.

ऑनलाइन वीज देयक भरण्यासाठी ग्राहकांना प्रोत्साहन मिळावे या हेतूने महावितरणच्या वतीने ऑनलाइन वीज देयक भरणा करणाऱ्या लघु दाब ग्राहकांसाठी लकी डिजिटल ग्राहक योजना सुरु करण्यात आली आहे. या योजने अंतर्गत सलग तीन महिने किंवा त्यापेक्षा अधिक कालावधी पासून ऑनलाइन वीज देयक भरणा करणाऱ्या व



थकबाकी नसलेल्या ग्राहकांचा समावेश आहे. यापैकी प्रत्येक उपविभाग स्तरावर ५ बक्षिसे वितरीत करण्यात येत आहे. संगमनेर शहर–१ उपविभागीय कार्यालयात झालेल्या कार्यक्रमात सदर दुसऱ्या फेरीतील बक्षिसांचे वितरण करण्यात आले. ह्या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी उपकार्यकारी अभियंता धनंजय खैरनार होते. यात संगमनेर शहर उपविभागातील वीज ग्राहक स्वाती सतीश राऊत यांना प्रथम क्रमांकाचे मोबाईल फोन, बाळू शंकर रुपवते व सोपान तात्याबा गुंजाळ यांना द्वितीय क्रमांकाचे प्रत्येकी मोबाईल फोन आणि कलावती श्रीनिवास पवार व कारभारी विश्वनाथ घुगे यांना प्रत्येकी तृतीय क्रमांकाचे बक्षीस वितरण उपकार्यकारी अभियंता धनंजय खैरनार यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी कक्ष अभियंता दिग्विजय लोहे, पवन बाविस्कर, सोमनाथ पवार, रुचिका गेडाम व सहाय्यक लेखापाल महेश आभाळे आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन महेंद्र पैठणे यांनी केले.



# भाजपा कार्यालयात स्व. गोपीनाथ मुंडे यांना अभिवादन

**नायक वृत्तसेवा, संगमनेर**

भाजपाचे ज्येष्ठ नेते, माजी केंद्रीय मंत्री स्व. गोपीनाथ मुंडे यांची पुण्यतिथी येथील भारतीय जनता पार्टीच्या कार्यालयात साजरी करण्यात आली. यावेळी स्व. मुंडे यांच्या प्रतिमेला शहराध्यक्षा पायल ताजणे यांनी पुष्पहार अर्पण केला. यावेळी उपस्थित पदाधिकाऱ्यांनी अमर रहे, अमर रहे, मुंडे साहेब अमर रहे अशा घोषणा दिल्या.

यावेळी राम जाजू, राजेंद्र सांगळे, सिताराम मोहरीकर, भारत गवळी, दीपक भगत, भरत फटांगरे, असिफखान पठाण, बबलू काझी, दिलीप रावल, सुधाकर गुंजाळ, हरीश चकोर, दिनेश सोमाणी, अरुण कुलकर्णी, भाऊ जाखडी, कल्पेश पोगुल, आशिष ताजणे, कैलास भरीतकर, गिरीश ससाणे, अनुराग ताजणे, संतोष पठाडे, श्रीकांत कासट, दीपेश ताटकर, विकास गुळवे, अमोल रनाते, प्रेम भालसिंग, विशाल येनगंदूल, पांडुरंग शेराल, रवी उडता, श्रीनिवास वलूसा, शुभम कोकणे, ज्योती भोर, कांचन ढोरे, अरुणा पवार, सुरेखा खरे, अंजना भालसिंग, रुपाली कानकाटे, मनिषा कांबळे, रेश्मा खांडरे, अ‍ॅड. गोरक्ष कापकर, हर्षवर्धन खुळे, श्याम कोळपकर, मनिषा शिंदे, संतोष डोगंरे, अमित गुप्ता यासह शहर व तालुक्यातील पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.



# वैदिक ज्योतिषशास्त्रात प्रसाद शास्त्री कुलकर्णींना पीएचडी

**नायक वृत्तसेवा, झरेकाठी**

राहुरी तालुक्यातील निंभेरे येथील प्रसाद शास्त्री कुलकर्णी यांना वेदभूषण ज्योतिष प्रतिष्ठान (सलग्न महाराष्ट्र ज्योतिष प्रतिष्ठान) यांच्या वतीने आयोजित विशेष कार्यक्रमात 'ज्योतिष प्रविण कुंडली शास्त्र' या विषयात पीएचडी पदवी प्रदान करण्यात आली.

या गौरव समारंभात कुलकर्णी यांना विविध मान्यवरांच्या उपस्थितीत प्रमाणपत्र देण्यात आले. त्यांना पीएचडी मिळाल्याबद्दल त्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.यावेळी आचार्यगण, गुरुजन, मित्रपरिवार व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.प्रसादशास्त्री कुलकर्णी हे ज्योतिष व याज्ञिक क्षेत्रातील गाढे अभ्यासक असून, महाराष्ट्रासह भारतात व परदेशातही त्यांना ऑनलाइन पूजा विधी करण्यासाठी निमंत्रित केले जाते.

# 'व्हॉईस ऑफ मीडिया' च्या मागणीला यश!

## शासनाकडून डिजिटल माध्यम जाहिरात धोरण जाहीर

**नायक वृत्तसेवा, मुंबई**

राज्य शासनाने अखेर व्हॉईस ऑफ मीडिया डिजिटल माध्यमांच्या दीर्घकालीन मागणीला प्रतिसाद देत एक महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. 'डिजिटल माध्यम शासकीय जाहिरात मार्गदर्शक सूचना' आता अधिकृतपणे जाहीर करण्यात आल्या असून त्या ३ जून २०२५ या तारखेपासून अंमलात आल्या आहेत.

गेल्या काही वर्षांपासून माहितीच्या प्रसारात डिजिटल माध्यमांचा वाढता प्रभाव लक्षात घेता, व्हॉईस ऑफ मीडिया संघटनेने मुंबई, बारामती व शिर्डी येथे झालेल्या अधिवेशनात शासनाकडे डिजिटल माध्यमांना शासकीय जाहिराती मिळाव्यात, अशी मागणी सातत्याने केली होती.

या मागणीचा विषय विधानभवनात आमदार सत्यजित तांबे, हेमंत पाटील यांनी लावुन धरला. या मागणीची दखल घेत सामान्य प्रशासन विभागाने ३ जून रोजी शासन परिपत्रक क्रमांक मावज–२०२५/२५१/प्र.क्र. १३२/मावज १ द्वारे हा निर्णय घोषित केला.

शासन परिपत्रकात नमूद केल्याप्रमाणे, या मार्गदर्शक सूचनांचा लाभ सर्व विभाग, महामंडळे, स्थानिक स्वराज्य संस्था आणि शासकीय कंपन्यांना होणार असून, ते आता डिजिटल माध्यमांना अधिकृतरित्या शासकीय जाहिराती देऊ शकतात. या निर्णयामुळे डिजिटल माध्यमांना आर्थिक स्थैर्य मिळेल,शासनाच्या योजना आणि धोरणांचा प्रसार अधिक प्रभावीपणे होईल,माहितीचा लोकांपर्यंत जलद आणि पारदर्शक पोहोच होईल.शासनाचे हे परिपत्रक अधिकृत संकेतस्थळावर (ु.ारहरीरिहीीर.सीं.ळप) उपलब्ध असून, त्याचा संकेतांक २०२५०६०३१५१४०९८७०७ आहे.

हा आदेश अवर सचिव अ. धों. भोसले यांच्या डिजीटल स्वाक्षरीसह निर्गमित करण्यात आला आहे. व्हॉईस ऑफ मीडियाचे संस्थापक अध्यक्ष संदीप काळे, प्रदेश अध्यक्ष अनिल म्हस्के, उपाध्यक्ष अजित कुंकूलोळ, डिजिटल विंगचे प्रदेश अध्यक्ष हर्षद लोहार, उपाध्यक्ष अश्विनी पुरी, सचिव इर्शाद शेख कार्याध्यक्ष अशोक घावटे, प्रविण पावले यांनी या निर्णयाचे स्वागत केले आणि राज्य शासनाचे आभार मानले. की त्यांनी नवमाध्यमांच्या अस्तित्वाला मान्यता देत एक सकारात्मक पाऊल उचलले आहे.





## (जागतिक पर्यावरण दिन औचित्य)

# माझियासाठी माझे पर्यावरण...

जगद्गुरू संत तुकोब्बारायांचे अवघे सोयरे तर वनचर, तरुवर–वेली, पक्षीजगत होते. साधुसंतांची धनसंपदा ही तर वनसंपदाच होती महाराज! माझ्यासारख्या सामान्य जीवाची पर्यावरणविषयक जाणीव जागृती अवगत करायची झाल्यास काही विलक्षण–विशेष, असामान्य अन् जगावेगळे मुळीच नाही. असलेच तर सर्वसाधारण–माझ्यापुरते पण आस्थेचे, निष्ठेचे काही पर्यावरणीय निकष मात्र जरुर आहे.

(१) जवळपास आजवरच्या आयुष्यात तब्बल तीस–पस्तीस वर्षे सकारण रोजच्या रोज पाच सहा कि.मी. पायीच चाललो.

(२) कोणत्याही दुकानात वस्तू खरेदी करतांना कोणत्याही परिस्थितीत (दुकानदाराने देऊ केल्यासही) प्लॅस्टिक पिशव्यांचा वापर न करता बरोबर असलेल्या कापडी पिशवीचा उपयोग केलेला आहे.

३) आहारात आणि पेय पदार्थांत आयुर्वेद तसेच नैसर्गिक घटकांशी पूरक वनस्पतींचा अधिकाधिक उपयोग करत आलोय.

तुळशीची पाने, बे लाची पाने–फळे, आले, गवती पत्ती, लसूण आणि अन्य वनस्पतीजन्य पदार्थ.

(४) दरवर्षी पावसाळ्यात काही फळझाडांची रोपे आठवणीने लावायचा परिपाठ असतो.

बाहेरगावी जाणे झाल्यावर अथवा आसपास रस्त्यावर काहीही प्लॅस्टिक पिशव्या अथवा कचरासदृश फेकायचे नाही हे कटाक्षाने पाळतो.

थोडक्यात काय तर शक्य तितके होता होईल तेवढे पर्यावरण संरक्षणाचे नियम सांभाळतो. असो..

५ जून, पर्यावरण दिन सदिच्छा!

**– डॉ. सुनील शिंदे**
अकोले, अहिल्यानगर

पान १ वरुन

**लग्नाचे आमिष दाखवून अल्पवयीन मुलीवर अत्याचार**

संबंध निर्माण केले. मुलीच्या कुटुंबात या प्रकरणाची वाच्वता झाल्यानंतर पीडितेने आम्ही लग्न करणार असल्याचे सांगत आपल्या वडिलांच्या मोबाईलवरुन आरोपीशी संपर्क केला. मात्र मुलीच्या घरी येवून तसे सांगण्यास टाळाटाळ करण्यासह काही वेळातच त्याने आपला मोबाईलही स्वीचऑफ केला. त्यातून आपली फसवणूक झाल्याचे लक्षात येताच साडे सोळा वर्ष वयाच्या पीडितेने संगमनेर तालुका पोलिसांकडे दिलेल्या तक्रारीवरुन पोलिसांनी आरोपी आदित्य अर्जुन शेटे याच्या विरोधात अत्याचारासह बाललैंगिक अत्याचार प्रतिबंधक कायद्यान्वये (पोक्सो) गुन्हा दाखल केला आहे. या प्रकारानंतर आरोपी पसार झाला असून पोलिसांकडून त्याचा शोध सुरु आहे.

याबाबत तालुका पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार सदरचा प्रकार गेल्या वर्षभराच्या कालावधीत घडला. गेल्यावर्षी पीडित मुलीच्या गावात राहाण्यासाठी आलेल्या आरोपी आदित्य अर्जुन शेटे याने दररोज महामंडळाच्या बसने संगमनेरला शिक्षणासाठी जाणाऱ्या साडेसोळा वर्षाच्या अल्पवयीन पीडितेशी संगमनेर बस स्थानकावर ओळख निर्माण केली. त्यानंतर तो त्याच्या वेगवेगळ्या मित्रांच्या माध्यमातून सतत पीडितेशी संपर्क साधू लागला. गेल्यावर्षी ५ डिसेंबररोजी पीडित मुलगी नेहमीप्रमाणे बसने संगमनेरला येताच तेथे आधीपासूनच हजर असलेल्या आरोपी आदित्य शेटे याने गोडगोड बोलून पीडितेला मोटर सायकलवरुन त्याच्या आई-वडीलांच्या घरी नेले. त्यावेळी घरात कोणी नसल्याचा गैरफायदा घेत पीडितेला लग्नाचे आमिष दाखवून त्याने तिच्यावर बळजबरीने अत्याचार केला. जवळपास दोनतास घरातच घालवल्यानंतर आरोपीने 'मी तुझ्याशी लग्न करणार आहे, आपण रोज भेटू' असे सांगत तिला पुन्हा संगमनेर बसस्थानकावर आणून सोडले.

चार महिन्यांपूर्वी १५ एप्रिलरोजीही सकाळी साडेदहाच्या सुमारास पीडित मुलगी बसने संगमनेरला येताच आरोपी आदित्य शेटे तेथे आला व त्याने मागीलप्रमाणे गोडगोड बोलून पीडितेला आपल्या दुचाकीवरुन पुन्हा त्याच्या आई-वडीलांच्या घरी नेले व पुन्हा लग्नाचे आमिष दाखवून दुसऱ्यांदा शरीरसंबंध निर्माण केले. त्यानंतर पुन्हा बसस्थानकावर सोडतांना 'आपण लग्न करणार आहोत, तु आपल्या संबंधाबाबत कोणाला काही सांगू नकोस' असे म्हणत तो निघून गेला. चालू महिन्याच्या सुरुवातीला १ जूनरोजी आरोपीने पीडितेला असेच बसस्थानकातून आपल्या दुचाकीवर बसवून शिर्डीलाही नेले व दर्शन करुन परत आणून सोडले.

दोन दिवसांनी या प्रकाराबाबत पीडित मुलीच्या वडीलांना भणक लागल्यानंतर त्यांनी त्याबाबत आपल्या मुलीकडे विचारणा केली. त्यावेळी पीडितेने 'आम्ही दोघं लग्न करणार आहोत' असे उत्तर दिले. त्यावर त्याला फोन करुन इथे बोलवं व माझ्यासमोर विचार असे तिच्या वडीलांनी बजावल्यानंतर त्यांच्याच मोबाईलवरुन पीडितेने आरोपीला फोन केला व समक्ष बोलण्यासाठी लागलीच घरी येण्यास सांगितले. सुरुवातीला त्याने 'येतो' असे म्हणतं वेळ मारली, मात्र पीडित मुलगी त्याला वारंवार फोन करु लागल्यानंतर त्याने 'तु मला जास्त फोर्स करु नकोस, नाहीतर मी जीवाचे बरेवाईट करुन घेईल' अशा धमक्या देत तो बोलण्यासही टाळाटाळ करु लागला. त्यावरुन आपली फसवणूक झाल्याचे पीडितेच्या लक्षात येताच आरोपीने आपल्याशी दोनवेळा शारीरिक संबंध ठेवल्याची बाब तिने आपल्या पालकांना सांगितली.

हा प्रकार ऐकून कष्ट करुन मुलांचे संगोपन करणाऱ्या त्या शेतकरी दाम्पत्याच्या पायाखालची जमीनच सरकली. मात्र आत्ता या प्रकाराकडे दुर्लक्ष केल्यास आरोपीचे मनोधैर्य वाढून तो आपल्या लेकीच्या आयुष्याचे मातेरं करेल या भयाने त्यांनी हिम्मत करुन तालुका पोलीस ठाणे गाठले व घडला प्रकार कथन केला. त्यावरुन पोलिसांनी आरोपी आदित्य अर्जुन शेटे याच्या विरोधात भारतीय न्यायसंहितेच्या कलम ६४, ६५ (१) सह बालकांचे लैंगिक अपराधापासून संरक्षण करणाऱ्या कायद्याचे (पोक्सो) कलम चारनुसार गुन्हा दाखल केला आहे. या प्रकारानंतर आरोपी पसार झाला असून तालुका पोलीस त्याचा शोध घेत आहेत.

**वीज कंपनीला 'त्या' फांद्या हटवण्याची उपरती**

दैनिक नायकने आपली सामाजिक जबाबदारी ओळखून सोमवारी या विषयावर कान उपटल्यानंतर उपरती झालेल्या वीज कंपनीने शहरात जागोजागी अस्ताव्यस्त पडलेल्या झाडांच्या फांद्या उचलण्यास सुरुवात केली.

जगभरात मोठ्या प्रमाणात होणारी जंगलतोड, वारंवार पेटणाऱ्या वणव्यांमधून हजारों हेक्टरवर बेचिराख होणारी वृक्षसंपदा, औद्योगिकीकरणातून वाढलेले वायू प्रदूषण अशा कितीतरी कारणांनी वैश्विक तापमानवाढीचे संकट निर्माण झाले आहे. जगातील अनेक देशांच्या सामान्य तापमानात बदल झाल्याने सृष्टीचक्रही प्रभावित होत असून ऋतुचक्रातही बदल होत आहेत. याच वेगाने पर्यावरणाचा ऱ्हास सुरु राहीला तर येणाऱ्या काही दशकांत निसर्गाचा कोप होण्याची भीती शास्त्रज्ञांनी वर्तविल्यानंतर जागतिक पातळीवरुन सृष्टी वाचवण्याचे प्रयत्न सुरु झाले असून पर्यावरण संवर्धन आणि संरक्षणावर अधिक भर दिला जात आहे.

सर्वसामान्यांमध्ये निसर्ग, पर्यावरणाविषयी जागृती निर्माण करुन राज्यातही व्यापक कार्यक्रम सुरु असताना संगमनेरच्या वीज कंपनीच्या असंवेदनशीलतेतून मात्र या प्रयत्नांनाच नख लावण्याचा प्रकार सुरु आहे. संगमनेर नगरपालिकेने काही खासगी आस्थापना, संस्था व नागरिकांच्या मदतीने शहरात मोठ्या प्रमाणात वृक्षारोपण घडवले असून पूर्वी ओसाड असलेल्या अनेक वसाहती आता झाडांच्या दाटीत हरवल्याचे चित्र निर्माण झाले आहे. शहराला शेकडों वर्षांचा इतिहास असल्याने येथील मानवी वस्ती आणि शहरातंर्गत रस्ते अतिशय अरुंद आणि दाटीवाटीचे असल्याने नव्याने वृक्षारोपणाचा पर्याय तसा दुर्मीळच. मात्र त्यावरही मात करुन शहरात मोठ्या प्रमाणात झाडे लावली जावून त्यांचे संगोपनही केले गेल्याने रस्त्यारस्त्यावर झाडे दिसू लागली आहेत.

मात्र पालिका आणि नागरिकांच्या या प्रयत्नांना वीज कंपनीचा मग्रुरपणा आडवा येत असून दरवर्षी विद्युत वाहिन्यांना अडथळा ठरत असल्याचे कारण पुढे करुन कंपनीकडून शहरात सर्रासपणे नागरी सहभागातून लावलेल्या आणि बहरलेल्या झाडांवर कुऱ्हाड फिरवली जात आहे. धक्कादायक म्हणजे केवळ ठेकेदारी पोसण्यासाठी सुरु असलेल्या या प्रकारात झाडे तोडणारा लाकूडतोड्याही आडहत्यारी निवडला जात असल्याने त्याच्या मनात येईल त्या प्रमाणे तो झाडांची छाटणी करीत आहे. त्यातून बहुतेक झाडांच्या अस्तित्वाचाच प्रश्न निर्माण झाल्याने अशा असंवेदनशील प्रकारे तोडलेल्या झाडांना पाहून नागरीकांचाही संताप होत आहे. विशेष म्हणजे सदरचा ठेकेदार केवळ झाडे तोडून 'गायब' होत असल्याने त्याने तोडलेल्या झाडांच्या फांद्या तशाच भररस्त्यात अस्ताव्यस्त पडून राहातात.

त्यामुळे आधीच अरुंद असलेल्या रस्त्यांवर वाहतुकीला अडथळा निर्माण होत असल्याने पादचारी, दुचाकीस्वार आणि व्यापारी अशा सर्वांनाच त्याचा त्रास सहन करावा लागतो. मात्र मनमानी कारभारातून केवळ माया जमवण्यात चटावलेल्या या विभागातील बहुतेक सर्वच अधिकाऱ्यांना त्याचे कोणतेही सोयरसुतक नसल्याने संगमनेरच्या वीज कंपनीकडून पर्यावरण आणि नागरीक अशा दोहींचाही छळ सुरु होता. याबाबतची वस्तुस्थिती निदर्शनास आल्यानंतर दैनिक नायकने आपली सामाजिक भूमिका ओळखून सोमवारी (ता.२) 'वीज वितरण कंपनीच्या मग्रुरीचा सर्वसामान्यांना त्रास!' या मथळ्याखाली वृत्त प्रसिद्ध करुन कान उपटताच वीज कंपनीला उपरती झाली आणि बुधवारपासून शहरातंर्गत रस्त्यावर जागोजागी अस्ताव्यस्त पडलेल्या छाटलेल्या झाडांच्या फांद्या उचलण्यास सुरुवात झाली.

**संगमनेर-अकोलेचे पक्के व सख्खे नाते ठेवू..**

भाऊ हे नाते आपल्याला ठेवायचे नसून संगमनेर-अकोले हे सख्खे भाऊ म्हणून सख्खे व पक्के नाते ठेवायचे आहे असा उपरोधीक टोला आमदार अमोल खताळ यांनी लगावला.

अकोले तालुक्यातील शिवसेनेच्या जिल्हा व तालुका पदाधिकारी यांचा सत्कार व शिर्डी देवस्थानचे विश्वस्त डॉ. जालिंदर भोर यांचा वाढदिवसाचा सन्मान सोहळा संगमनेरचे आमदार अमोल खताळ व शिवसेना जिल्हाध्यक्ष कमलाकर कोते यांच्या प्रमुख उपस्थितीत येथील शासकीय विश्रामगृहावर पार पडला. यावेळी आ.खताळ बोलत होते. यावेळी शिवसेना उपजिल्हा प्रमुख मारुती मेंगाळ, तालुका प्रमुख सुशांत गजे, शहर प्रमुख सचिन शेटे, जगन देशमुख, आरोग्य विभागाचे डॉ. अमोल भोर, संजय वाकचौरे, महेश देशमुख, बाळासाहेब भोर, गणेश पापळ, जावेद जाहागिरदार, सचिन भालेराव, वाल्मिक मैड, माजी नगरसेवक सुरेश लोखंडे आदी उपस्थित होते.

पुढे बोलतांना आ.खताळ म्हणाले की, मी लहानपणापासून पाहत आलोय की, अकोले तालुक्यात स्व.बाळासाहेब ठाकरे व ना. एकनाथ शिंदे यांच्या विचाराचे शिवसैनिक जास्त आहेत. उपमुख्यमंत्री ना. एकनाथ शिंदे यांचे फॅमिली डॉक्टर असलेले अकोलेचे भुमिपुत्र डॉ. जालिंदर भोर यांनी तालुक्यातील तरुणांना, जुन्या नव्या शिवसैनिकांना एकत्रित करत काही दिवसांपूर्वी ठाणे येथे ना. एकनाथ शिंदे यांच्या हस्ते शिवसेना पक्ष प्रवेश सोहळा पार पडला. यावेळी ना. शिंदे यांनी अकोलेकरांना अश्वासित केले आहे. राज्यात आजपर्यत कोणत्याही नेत्याकडुन झाले नाही, एवढे काम ना. एकनाथ शिंदे यांनी केले आहे. ना.एकनाथ शिंदे व ना. राधाकृष्ण विखे यांच्यामुळे माझ्या सारख्या सामान्य कार्यकर्त्याला जनतेने साथ दिली. सुरूवातीला संगमनेर शिवसेनेची अवस्था बिकट होती, त्यावेळी म्हणत होते शिवसेनेचे पदाधिकारी संगमनेरचे काँग्रेसचे नेता ठरवत होते परंतु ना. एकनाथ शिंदे यांच्यामुळे ही परिस्थिती बदलली.

**CHANGE IN NAME**

MY OLD NAME
MADANE GORAKSHNATH BHIMA
MY NEW NAME
MADANE GORAKSHANATH BHIMAJI

अकोले तालुका आदिवासी, गोरगरीब, डोंगरदऱ्यांचा तालुका आहे. येथे संजय गांधी निराधार योजनेचे काम मोठ्या प्रमाणात होणे गरजेचे आहे. मी गेली काही वर्षे या योजनेचे काम करुन संगमनेरातील लोकांना लाभ मिळवून दिला आहे. त्यामुळे मला अनुभव आहे. गरज भासल्यास मला कधीही संपर्क करा. शिवसैनिकान आता ना. शिंदे यांची ताकद तुमच्या पाठिशी आहे, कामाला लागा. महायुती सरकारच्या योजना तळागाळात पोहोचवा. येत्या काही दिवसांत जिल्हा परिषद, पंचायत समिती निवडणुका येत आहेत. उपजिल्हा प्रमुख मारुती मेंगाळ यांना पंचायत समितीचा चांगला अनुभव आहे. त्यामुळे या निवडणूकीत मागे पडायचे नाही.

यावेळी डॉ. जालिंदर भोर म्हणाले, माझा वाढदिवस मी सहसा साजरा करत नाही. अकोलेत शिवसैनिकांनी प्रवेश केल्यानंतर आता ना. एकनाथ शिंदे यांनी मोठी जबाबदारी आपल्यावर टाकली आहे ना. शिंदे यांच्याशी माझे कौटुंबिक नाते आहे. माझ्या जीवनात कॉलेजचे ॲडमिशन स्व. आनंद दिघे यांनी केले. त्यानंतर माझ्या दोन्ही हॉस्पिटलचे उद्घाटन स्व दिघे यांनीच केले. त्यानंतर ना. एकनाथ शिंदे यांचा व माझा वैद्यकीय सेवेतून संबंध आला. तो इतका कौटुंबिक झाला की ना.एकनाथ शिंदे यांचा फॅमिली डॉक्टर झालो. माझे ना.शिंदे यांच्याशी संबंध पाहता अनेकांना वाटते मी एखादे पद, ठेकेदारी घ्यावी मात्र उपमुख्यमंत्र्यांचा फॅमिली डॉक्टर ही पदवी कोणत्याही पदापेक्षा मोठी असल्याचे ते म्हणाले. यावेळी शिवसेना जिल्हाध्यक्ष कमलाकर कोते यांनी ब्राम्हणवाडा येथील शहिद जवान संदिप गायकर यांच्या कुटुंबाला घर बाधून देण्याचा शिवसेनेचा संकल्प असल्याचे सांगितले. अकोले मतदार संघात शिवसेनेचा आमदार होवु शकतो असे सांगत येत्या काळात जि. प. व पं. स. निवडणूकीत चांगले काम करा असे आवाहन त्यांनी केले.

संगमनेर येथे संपर्क कार्यालय सुरु करत आहोत. हे कार्यालय संगमनेर-अकोले विभागातील लोकांचे प्रश्न सोडवण्यासाठी राहणार असुन या कार्यालयाचे उद्घाटन ना. एकनाथ शिंदे यांच्या हस्ते लवकरच होणार आहे. या कार्यक्रमाला उपस्थित राहावे असे आवाहन आ. खताळ यांनी यावेळी केले.

**उत्पादन वाढीसाठी ए आय तंत्रज्ञानाचा वापर..**

करावेच लागतात. परमेश्वराच्या आशीर्वादाने कारखान्याची व सहकाराची चांगली वाटचाल सुरू असल्याचे प्रतिपादन सहकार महर्षी भाऊसाहेब थोरात सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांनी केले.

सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात सहकारी साखर कारखान्याच्या सन २०२५-२६ या गळीत हंगामासाठी पहिल्या मिल रोलरचे पूजन करण्यात आले, यावेळी चेअरमन थोरात बोलत होते. यावेळी व्हा. चेअरमन पांडुरंग घुले, रणजीतसिंह देशमुख, संपत डोंगरे, सुधाकर जोशी, लक्ष्मण कुटे, संचालक संपत गोडगे, इंद्रजीत थोरात, डॉ.तुषार दिघे, विनोद हासे,रामदास धुळगंड, विलास शिंदे, रामनाथ कुटे,नवनाथ आरगडे, विजय राहणे, गुलाब देशमुख, अरुण वाकचौरे,योगेश भालेराव, अंकुश ताजणे, दिलीप नागरे,लता बाबासाहेब गायकर,सुंदरबाई रावसाहेब डूबे, कार्यकारी संचालक जगन्नाथ घुगरकर, सेक्रेटरी किरण कानवडे आदींसह विविध पदाधिकारी उपस्थित होते.

यावेळी बोलतांना माजी मंत्री बाळासाहेब थोरात म्हणाले की, साखर कारखानदारी मध्ये प्रत्येक हंगाम हा आव्हानाचा आणि कष्टाचा असतो. व्यवस्थापन, अधिकारी, कर्मचारी हे सर्व कुटुंब असून सर्वांनी ज्याचे त्याचे काम चांगले केल्याने यश मिळत असते. शरीराच्या अवयवाप्रमाणे कारखान्याचा प्रत्येक पार्ट महत्त्वाचा असून हाफ सीजन मध्ये सतर्क राहून प्रत्येक गोष्टीची काळजी घ्यावी लागते.

कारखाना कार्यक्षेत्रात ऊस उत्पादन वाढले पाहिजे. याकरता ऊस विकास मेळाव्यांचे आयोजन सुरू असून आगामी काळामध्ये एकरी उत्पादन वाढवण्यासाठी नवीन तंत्रज्ञान वापरणे आवश्यक आहे. याचबरोबर लागवड करतांना टप्प्याटप्प्याने केली पाहिजे. ८६०३२ हा ऊस नव्या तंत्रज्ञानानुसार अगदी १२ ते १३ महिन्यात काढण्यासाठी येऊ शकतो. कमी पाणी, कमी श्रम आणि जास्त उत्पादन हे तत्व अवलंबताना कार्यक्षेत्रामध्ये जास्तीत जास्त ऊस उत्पादन करण्यासाठी शेतकऱ्यांनी काम करावे असे आवाहन त्यांनी केले. व्हा. चेअरमन पांडुरंग घुले म्हणाले की सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात यांच्या आदर्श तत्वावर कारखान्याची वाटचाल सुरू असून बाळासाहेब थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली आगामी काळात शेतकरी, सभासद, कर्मचारी हे सर्व मिळून एकत्रितपणे चांगले काम करू असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.याप्रसंगी विष्णू ढोले, रामनाथ शिंदे, नामदेव शिंदे, बाबजी वामन, संभाजी वाकचौरे, शिवाजी जगताप, प्रा. बाबा खरात, अनिल सोमणी, अशोक मुटकुळे, नवनाथ गडाख, भाऊसाहेब खर्डे, अशोक कवडे आदींसह सर्व विभाग प्रमुख, कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक कार्यकारी संचालक जगन्नाथ घुगरकर यांनी केले. सूत्रसंचालन नामदेव कहांडळ यांनी केले. व्हा. चेअरमन पांडुरंग घुले यांनी आभार मानले.

**'अगस्ती' बाबत नेहमी सहकार्याची भूमिका राहील...**

१३ कर्मचाऱ्यांच्या सेवापुर्ती सोहळ्याच्या निमित्ताने झालेल्या कार्यक्रमात ते बोलत होते.यावेळी व्यासपीठावर अगस्ती कारखान्याचे ज्येष्ठ संचालक व अगस्ती पतसंस्थेचे चेअरमन

**व्यापाऱ्याचे अपहरण करून लुटणारे गजाआड!**

आरोपी हे फरार झाले असल्याने, तसेच घडलेल्या गुन्ह्यांची प्राथमिक माहिती मिळताच जिल्हा पोलीस अधीक्षक यांनी स्थानिक गुन्हे शाखा यांना गुन्ह्याचा समांतर तपास करुन, गुन्ह्यातील आरोपींचा शोध घेणेबाबत आदेश दिले. त्यानुषंगाने स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक दिनेश आहेर यांनी स्थानिक गुन्हे शाखा व तपास पथकातील पोलीस उपनिरीक्षक अनंत सालगुडे व पोलीस अंमलदार सुरेश माळी, फुरकान शेख, सागर ससाणे, विशाल तनपुरे, किशोर शिरसाठ, प्रशांत राठोड व भगवान धुळे अशांचे पथक नेमुन आरोपींचा शोध घेणेबाबत सुचना देऊन पथकास रवाना केले. दि.४ जून रोजी पथक गुन्ह्यातील आरोपींचा गोपनीय माहिती व तांत्रीक विश्लेषणाच्या आधारे तपास करत असताना आरोपी शाकीर कुरेशी व इरफान कुरेशी, रा. तिसगाव, ता. पाथर्डी हे छत्रपती संभाजीनगर येथे असले बाबत माहिती मिळाली. मिळालेल्या माहितीवरून पथकाने छत्रपती संभाजीनगर येथे जाऊन सिल्लेखान परिसरात आरोपीचा शोध घेऊन शाकीर सलीम कुरेशी (वय २४) व इरफान फैजु कुरेशी (वय ३३)दोघेही रा.तिसगाव, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर यांना ताब्यात घेतले.

# ग्रामीण समस्यांकडे पत्रकारांनी डोळसपणे पाहणे गरजेचे : संदीप वाकचौरे

**नायक वृत्तसेवा, शिर्डी**



ग्रामीण पत्रकारिता म्हणजे गावगाड्याचा दस्तऐवज असतो. तो जितका प्रगल्भ असेल, तितका तो प्रभावी ठरतो. त्यामुळे ग्रामीण समस्यांकडे पत्रकारांनी अधिक डोळसपणे पाहणे गरजेचे असल्याचे प्रतिपादन ज्येष्ठ पत्रकार संदीप वाकचौरे यांनी केले.

व्हाईस ऑफ मीडिया पत्रकार संघटनेच्या वतीने कोपरगाव तालुक्यातील कोकमठाण येथील आत्मा मालिक पावन भूमीत आयोजित ग्रामीण पत्रकारितेवरील दोन दिवसीय कार्यशाळेत 'ग्रामीण पत्रकारिता' या विषयावर वाकचौरे बोलत होते. यावेळी संदीप वाकचौरे म्हणाले की, मुंबईसारख्या महानगरात बसलेले संपादक ग्रामीण वास्तवाकडे गांभीर्याने पाहत नाहीत. ग्रामीण बातम्यात 'ग्रॅव्हिटी' नसते असा गैरसमज त्यांचा आहे. पण वस्तुस्थिती अशी आहे की ती 'दाखवली' जात नाही, असेही त्यांनी सांगितले. ग्रामीण भागातील पत्रकारांनी केवळ घडामोडी नोंदवण्यावर भर न देता सामाजिक संदर्भासह प्रश्न मांडावेत.

> ■ ग्रामीण पत्रकारांना बातमी शोधायची नसते, ती त्यांच्या अवतीभवती घडत असते. त्यांना पाहण्याची दृष्टी, समजून घेण्याची जबाबदारी आणि मांडण्याची जिद्द असावी लागते, असे सांगत सर्व पत्रकारांनी स्थानिक प्रश्नांना आपल्या पत्रकारितेच्या माध्यमातून न्याय देण्याचा प्रयत्न करावा असे आवाहन संदीप वाकचौरे यांनी यावेळी केले.

जलसंधारण, अनुदान, पर्यावरणीय परिणाम, सार्वजनिक आरोग्य व्यवस्थेची दयनीय अवस्था, बालमृत्यूचे प्रमाण, महिलांचे आरोग्य या विषयावर सखोल मार्गदर्शन करत ग्रामीण पत्रकारांसमोर असणाऱ्या वास्तववादी जबाबदाऱ्या अधोरेखित करतांना शेती, आरोग्य, शिक्षण, कुपोषण, जलसंधारण अशा विषयांवरील संवेदनशील व अभ्यासपूर्ण वार्तांकनावर भर देण्याचे आवाहन त्यांनी करत सखोल विश्लेषणात्मक बातम्या कराव्यात असे त्यांनी सांगितले.गावात एक महिला आरोग्य अधिकारीही नसणं, शाळा बंद होणं, शेतकऱ्यांचे देशी प्रयोग, शिक्षणातले धोरणात्मक बदल हे सगळे प्रश्न पत्रकाराने समजून घेऊन हे विषय पत्रकारितेच्या माध्यमातून मांडले जावेत अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. या कार्यशाळेमध्ये मुक्त गोठा प्रकल्प, पीक व्यवस्थापन, स्थानिक पातळीवरील न्यायालयीन लढे, तसेच बियाण्याची फसवणूक, वंचित घटकांचे शिक्षण, कुपोषणासारख्या मुद्द्यांवर भर देण्यात आला.

नायक ANCHOR

# आयन फ्रेशला अल्पवधीतच संगमनेरकरांची पसंती!

## जुने कपडे नवे करून मिळत असल्याने ग्राहकांची गर्दी

**नायक वृत्तसेवा, संगमनेर**



बीई मेकॅनिकल प्रियंका सुरज निमसे, आणि त्यांचे पती बी टेक मेकॅनिकल शिक्षण घेतलेले सुरज निमसे या पती-पत्नीने उच्च शिक्षण पाठीशी असताना देखील नोकरीच्या मागे न लागता संगमनेरकरांची गरज ओळखून जून २०२३ दहा बाय दहा च्या गाळ्यामध्ये दोन कामगारांसोबत आयन फ्रेशची सुरुवात केली. आणि बघता बघता आयन फ्रेशने संगमनेरकरांची मने जिंकली. जिथे जुने कपडे नवे करून मिळत असल्याने संगमनेरकरांची चकाकी वाढली आहे.

संगमनेरच्या लोकांच्या कपडे धुण्यासाठी मोठ्या शहरात म्हणजे अहिल्यानगरला मोठ्या प्रमाणात जातात, ही गोष्ट लक्षात घेऊन आपण संगमनेर मध्ये अशीच सेवा का देऊ नये, म्हणून क्वालिटी व रेट ची योग्य सांगड घालून मेट्रो शहरासारखी क्वालिटी देण्याचा संगमनेर मध्ये प्रयत्न केला व त्याला अल्पावधीत चांगले यश मिळाले. सप्टेंबर २०२४ ला संगमनेर औद्योगिक वसाहत मध्ये प्लांट सेटअप केला. सध्या मालदाड रोडला कलेक्शन सेंटर व एमआयडीसी मध्ये युनिट असे सुरू आहे. ड्राय क्लीन साठी संगमनेर सह अकोले, साकुर, आळेफाटा, सिन्नर, राहाता येथूनही ग्राहक येतात. लग्नाचे कपडे विशेषतः हळदीचे कपडे एकदम नव्यासारखे करून घेतात. आयन फ्रेश मध्ये सध्या नऊ जणांचा स्टाफ आहे.

आयन फ्रेश मध्ये फक्त इको फ्रेंडली केमिकलचाच वापर केला जातो तसेच वॉशिंग साठी अत्याधुनिक मशीनचा वापर होतो. सर्व स्टीम ऑपरेटेड मशीनचा वापर केला जातो, त्यामुळे कपड्यांची लाईफ वाढते. तसेच ग्राहकांसाठी फ्री पिकअप आणि डिलिवरी सेवा उपलब्ध करून दिली आहे.

# समृद्ध भारताच्या निर्मितीसाठी विज्ञाननिष्ठ व्हा : इल्हे

**नायक वृत्तसेवा, संगमनेर**



ए.आय, फेसबुक, व्हाट्सअप, इंटरनेटच्या जमान्यात वावरत असतानाही आजचा तरुण हा जिद्द, चिकाटी, प्रयत्नांऐवजी कर्मकांडी, बुद्धी ऐवजी दैववादी होत आहे. समृद्ध भारताच्या प्रगतीसाठी आजच्या तरुणाने विज्ञानाची कास धरून विज्ञानवादी बनले पाहिजे असे विचार आधार फाउंडेशनचे समन्वयक, सामाजिक कार्यकर्ते सुखदेव इल्हे यांनी मांडले.

येथील सह्याद्री विद्यालयात बालसंस्कार शिबिरात चमत्कार सादरीकरण करतांना सुखदेव इल्हे यांनी सांगितले की, विज्ञान हे अनेक गृहीतकांच्या आधारे निरीक्षण, तर्क, प्रयोग, अनुमान, पडताळा या माध्यमातून बुद्धीच्या निकषावर सिद्ध झालेले असते, ते सर्व जगाला मान्य असते. चमत्कार सादरीकरणाची अनेक प्रयोग विद्यार्थ्यांना दाखवत त्यामागील विज्ञान किंवा हातचलाखी त्यांनी समजून सांगितली. जगात कुठेच चमत्कार कुठल्या तरी माध्यमाशिवाय घडत नाहीत. समाजातील अनेक धर्मात अनेक बुवा-बाबा असे चमत्कार करून गोरगरीब समाजाची फसवणूक करतात. अशा बदमाश बुवा-बाबांपासून जीवनभर दूर राहण्याचा संकल्प मुलांनी केला.अनेक प्रयोगांमध्ये स्वतः मुलांनी सहभाग घेतल्यामुळे मुलांच्या चेहऱ्यावर निर्भेळ आनंद दिसत होता. यावेळी सह्याद्री विद्यालयाचे प्राचार्य किसन खेमनर, सुरेखा दिघे, दत्तात्रय गुंजाळ, किशोर देशमुख, जगन गवांदे, उज्वला घुले, अर्चना घोरपडे तसेच सह्याद्री प्राथमिक मधील सर्व शिक्षक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**A ORNATE FFINE DECOR**
**पाहिजेत**

| अ.क्र. | पदाचे नाव | जागा |
| --- | --- | --- |
| 1. | फर्निचर कामाकरिता सुपरवायझर | 2 |
| 2. | कॉम्प्युटर ऑपरेटर | 2 |
| 3. | हेल्पर | 2 |

पत्ता : निंबाळे रोड, समनापुर, गणपती मंदिराजवळ, समनापुर , संगमनेर . मोबाईल - 97 67 04 18 99

कोथमिरे त्रिशुल छाप मसाले ॲग्रो प्रोडक्टस् कंपनीकरीता
चवीला खरे कोथमिरे! SINCE 1992 कोथमिरे
**ड्रायव्हर पाहिजेत**
1) कार ड्रायवर- 1 जागा
2) कमरशियल ड्रायव्हर-1 जागा
(सर्व गाड्यांचे ज्ञान, लायसन आवश्यक) अनुभव कमीत कमी ५ वर्षे
निरव्यसनी, प्रामाणिक व होतकरु इच्छुकांनी संपर्क साधावा.
आकर्षक पगार व सुविधा उपलब्ध
पत्ता- १८५६, वेल्हाळे रोड, गुंजाळवाडी, संगमनेर
मोबाईल क्र. ९९७०२९५३८६, ९५६१११९५८५




MALPANI
प्रोसेस विभागात
**कामगार भरती**
चालू आहे!
वयोगट १८ ते ३५ वर्षापर्यंत, शिक्षणाची अट नाही,
पुरुष कामगारांसाठी होस्टेलची सुविधा, कंपनी युनिफॉर्म,
नियमानुसार पी.एफ., बोनस, ई.एस.आय.सी. (शासकीय वैद्यकीय विमा)
पाल्यांसाठी मोफत पाठ्यपुस्तक योजना, सवलतीच्या दरात कॅन्टीन व
ग्राहक भांडारची सोय, या सारख्या अनेक सोई-सुविधा व सवलती
सर्व लाभांसह एकत्रीत दर (८ तासांसाठी) दैनिक वेतन रु. ५४०/-
अधिक माहितीसाठी संपर्क
मे. दामोदर जगन्नाथ मालपाणी
मालपाणी इस्टेट, अकोले रोड, ता. संगमनेर, जि. अहमदनगर
मो. ८९५६९५६६१२
मो. ९८२२६०१६५२
मो. ९५५२८८१३००

'बांधिलकी जनहिताची नायक' हे दैनिक मालक, मुद्रक व प्रकाशक घनश्याम हनुमानप्रसाद तिवाडी यांनी विकास प्रिंटिंग ॲण्ड कॅरिअर्स प्रा.लि., प्लॉट नं. ३२, एम.आय.डी.सी. सातपूर, नाशिक येथे छापून ऐश्वर्या कॉम्प्लेक्स, तळमजला, गाळा क्रमांक बी-१०, बस स्टॅन्डजवळ, संगमनेर, ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर - ४२२ ६०५ येथे प्रसिद्ध केले. संपादक : गोरक्षनाथ भिमाजी मदने, कार्यकारी संपादक : श्याम तिवारी.

पाहिजेत

धन्वंतरी मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल

| अ.नं | पद | जागा |
|---|---|---|
| १ | R.M.O | २ |
| २ | Bsc Nursing | २ |
| ३ | Driver Plus Receptionist | २ |
| ४ | Maintanance | २ |
| ५ | Data opretor (MJPJAY and cashless department) | २ |

पत्ता: ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर, जि. अ. नगर
मो. ७४९९१७६८६४, ९४२०८५४३०६
फोन:०२४२५-२२७५७५/२२७५७४

बांधिलकी जनहिताची
# नायक
MAHMAR/2018/75654 | SRP/135/2022-2024

जिथे काळजी आणि उपचार एकत्र येतात...
ताम्हाणे हॉस्पिटल
इंदिरानगर, गल्ली नं. १०, संगमनेर
डॉ. विशाल ताम्हाणे (एम.एस.-शल्य) कन्सल्टंट जनरल अँण्ड लेझर सर्जन
डॉ. रुपाली विशाल ताम्हाणे (बी.ए.एम.एस.) स्त्रीरोग / प्रसुती चिकीत्सक
Help Line : 7219 100 100
मेडिसिन ▪ सर्जरी ▪ लेझर सेंटर ▪ स्त्रीरोग-प्रसुति ▪ मुळव्याध-भगंदर-फिशर



शेरवानी शानदार.. रुबाब दिमाखदार..
लग्न म्हणजे बस्ता. बस्ता म्हणजे राजेन्द्र.

१९५९ पासून
विश्वासाची सार्थ परंपरा...
राजेन्द्र
मेन रोड, संगमनेर. फोन : 02425-225740, 7901031155

# घंटागाडी आणि दुचाकीचा अपघात!

## जखमीचा उपचारादरम्यान मृत्यू

**नायक वृत्तसेवा, संगमनेर**

पालिकेच्या घंटागाडीच्या आणि दुचाकीच्या अपघातात गंभीर जखमी झालेल्या तालुक्यातील सावरगाव घुले येथील भाऊसाहेब कारभारी घुले यांचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. त्यांच्यावर शोकाकुल वातावरणात गुरुवारी सकाळी सावरगाव घुलेत अंत्यसंस्कार करण्यात आले.

सोमवार दि.२ जून रोजी दुपारी १.३० वाजेच्या सुमारास ही घटना संगमनेर खुर्द येथील शिवनेरी पतसंस्थेजवळील वळ-णावर घडली होती. सावरगाव घुले येथील भाऊसाहेब कारभारी घुले (वय ५५) हे सोमवारी कामानिमित्त संगमनेर येथे आले होते. दुपारी १.३० वाजेच्या सुमारास ते काम आटोपून जुन्या नाशिक- पुणे महामार्गावरून आपल्या घराकडे जात होते.



संगमनेर खुर्द येथील शिवनेरी पतसंस्थेच्या नजीक असलेल्या वळणावर त्यांची दुचाकी आली असता पालिकेची घंटागाडी (छोटा हत्ती) क्रमांक एम.एच. १७ बी. वाय ३८५२ यांची धडक झाली. या अपघातात भाऊसाहेब घुले यांना डोक्याला जोराचा मार लागला असतानाही त्यांना उपचारासाठी न नेता घंटागाडी चालक घटनास्थळी न थांबता निघून गेला. जखमी भाऊसाहेब घुले यांना स्थानिकांनी तात्काळ शहरातील खाजगी रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले होते. दोन दिवस मृत्यूशी झुंज दिल्यावर अखेर बुधवारी सायंकाळी त्यांचा मृत्यू झाला. गुरुवारी सकाळी सावरगाव घुले येथे त्यांच्यावर शोकाकुल वा-तावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले. भाऊसाहेब घुले यांच्या पश्चात पत्नी, मुले भारतीय लष्करात कार्यरत असलेले मेजर राजेंद्र आणि प्रमोद,सुना, एक मुलगी, नातवंडे असा मोठा परिवार आहे. दरम्यान जुन्या पुणे- नाशिक महामार्गावर संगमनेर खुर्द शिवारातील शिवनेरी पतसंस्थेजवळ टाकलेले गतिरोधक चुकीच्या पद्धतीने टाकले असल्याचा आरोप वाहन चालक करत आहेत. या गतिरोधकांची उंची मोठ्या प्रमाणात असल्याने दुचाकी आणि चार चाकी वाहने या गतिरोधकांवरून जोरात आढळत असल्याने वाहनांचा खिळ खिळा तर वाहन चालवणाऱ्या चालकांना मनस्ताप सहन करावा लागत आहे.

# विविध गावांमध्ये निळवंडे पाण्याचे जलपूजन!

## निळवंडेच्या पाण्यामुळे तालुक्यात जलसमृद्धी : देशमुख

**नायक वृत्तसेवा, संगमनेर**

निळवंडे धरण व कालव्यांचे निर्माते माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांच्या प्रयत्नातून आणि पाठपुराव्यामुळे झालेल्या निळवंडे डाव्या व उजव्या कालव्यातून आलेल्या पाण्यामुळे संगमनेर तालुक्यांमधील विविध गावांमधील बंधारे व गाव तळी भरण्यात आली आहेत. यामुळे तालुक्यात जलसमृद्धी निर्माण झाली असल्याचे प्रतिपादन राजहंस दूध संघाचे चेअरमन रणजितसिंह देशमुख यांनी केले.

तालुक्यातील अंभोरे, पानोडी,मालुंजे, पिंपरणे येथे राजहंस दूध संघाचे चेअरमन रणजितसिंह देशमुख यांच्या हस्ते उजव्या कालव्यातून आलेल्या पाण्याने भरलेल्या बंधार्यांचे जलपूजन करण्यात आले. यावेळी कारखान्याचे संचालक सतीश वर्पे,



गंगाराम वाकचौरे, अण्णा राहिंज, लहानभाऊ वर्पे, रवींद्र रोहम, अरुण देशमुख, शुभम काळे, दिनकर वाकचौरे, नवनीत देशमुख,राजेंद्र देशमुख, सरपंच नारायण मरभळ, अरुण राहिंज, रमेश राहिंज, बाबासाहेब राहिंज, संजय राहिज, कृष्णा रकटे, भिमाजी राहिंज यांच्यासह विविध पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

उजव्या कालव्यातून कालव्या लगतच्या गावांना पाणी मिळावे याकरता सहकार महर्षी भाऊसाहेब थोरात सहकारी साखर कारखान्याच्या माध्यमातून सुमारे दोन कोटी रुपयांचे पाईप देण्यात आले असून या माध्यमातून या गावांमधील बंधारे भरवण्यात आली आहेत. या पाण्याने भरलेल्या बंधार्यांचे जलपूजन मोठ्या आनंदाने करण्यात आले.

याप्रसंगी बोलतांना रणजीतसिंह देशमुख म्हणाले की, विभागाच्या विकासाकरता पाणी हे अत्यंत महत्त्वाचे असून माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांनी दुष्काळी भागाचा कायमचा पाणी प्रश्न सुटावा याकरता निळवंडे धरण व कालवे पूर्ण केले. डावा आणि उजवा कालवा पूर्ण करण्यासाठी त्यांनी आमदारकी आणि मंत्रीपद पणाला लावले. मोठ्या कष्टातून हे ऐतिहासिक काम पूर्ण झाले आहे आणि त्यांच्या पाठपुराव्यामुळे आणि प्रयत्नातून आज दोन्हीही कालव्यांमधून पाणी सुरू आहे. यामुळे या भागातील बंधारे पाण्याने भरून घेण्यात आली आहेत. या पाण्याचा शेतीसाठी मोठा उपयोग होणार असून पाण्यामुळे

- माजी मंत्री थोरात यांच्या प्रयत्नातून दुष्काळी तालुक्याचे रूपांतर प्रगतशील तालुक्यामध्ये झाले असून कृषी, दुग्ध, शिक्षण, सहकार अशा सर्व क्षेत्रांमध्ये संगमनेर तालुका हा राज्याला दिशादर्शक ठरत असल्याचे रणजितसिंह देशमुख यावेळी म्हणाले.

जलसमृद्धी निर्माण झाली आहे.अण्णा राहींज म्हणाले की, ज्या लोकांनी धरणाला विरोध केला, त्यांची आज सत्ता आहे. त्यांचे कालवे आणि धरणामध्ये कोणतेही योगदान नाही. निळवंडेचे पाणी तालुक्यातील प्रत्येक गावात येणे हा तालुक्यासाठी आनंदाचा क्षण असल्याचे ते म्हणाले.याप्रसंगी गावोगावी मोठ्या उत्साहात जल पूजन करण्यात आले. यावेळी गावातील युवकांनी मिरवणूक काढून आनंद उत्सव साजरा केला.

# पत्रकारितेतील अपप्रवृत्ती समाजासाठी घातक :आ.खताळ

**नायक वृत्तसेवा, कोपरगाव**

पत्रकारिता क्षेत्रातही आता पेव फुटल्याने पत्रकारांची खरी व्याख्याच स्पष्ट होत नाही. परंतु एखाद्या समूहाशी, संघटनेशी जोडले गेल्याने पत्रकारांच्या अस्तित्वाची जाणीव होते. व्हाईस ऑफ मीडिया या संघटनेच्या माध्यमातून पत्रकारांच्या विश्वासार्हतेस बळकटी येत असल्याचे सांगत, हल्ली पत्रकारांबद्दल फारसे चांगले बोलले जात नसल्याची खंत व्यक्त करत या क्षेत्रात बोकाळत चाललेली अपप्रवृत्ती ही पत्रकारितेबरोबर समाजासाठी घातक असल्याचे प्रतिपादन आमदार अमोल खताळ यांनी केले.

तालुक्यातील कोकमठाण येथील आत्मा मलिक येथे पत्रकारांसाठी दोन दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते, त्यावेळी आ. खताळ बोलत होते.

यावेळी मंचावर परमपूज्य परमानंद महाराज, आशिष आनंद महाराज, संजीवनी उद्योग समूहाचे बिपिन कोल्हे, आदी मान्यवर उपस्थित होते.

येणारा काळ खऱ्या अर्थाने पत्रकारांसाठी एक आव्हान आहे. पत्रकारांनी डिजिटल माध्यमातून शाश्वत विषयांच्या बातम्या हाच विषय बनवून नावलौकिक संपादन



करावा असे आवाहन आमदार खताळ यांनी केले. ते म्हणाले की, याच विश्वासार्हतेवर पत्रकारांना पुढे जावे लागणार आहे. आ.खताळ म्हणाले की, आपण पत्रकाराचे आयुष्य फार जवळून बघितले असल्याची आठवण त्यांनी यावेळी करून दिली. माझ्या मतदार संघातील पत्रकारांच्या सुख- दुःखात मी नेहमीच एकरूप असतो. पत्रकार भवनासाठी १० लाख रुपये मंजूर केल्याचे त्यांनी यावेळी आवर्जून सांगितले. पत्रकार हा आपल्या कुटुंबाचा आणि समाजाचा एक अविभाज्य घटक आहे. कुटुंबातील एक सदस्य या भूमिकेतून पत्रकाराकडे आपण सर्वांनीच बघितले पाहिजे असे ही आ.खताळ म्हणाले, यावेळी त्यांनी कार्यशाळेला शुभेच्छा दिल्या. यावेळी उपस्थित पाहुण्यांच्या हस्ते व्हाईस ऑफ मीडियाच्या मुखपत्राचे प्रकाशन करण्यात आले. यावेळी व्हॉइस ऑफ मीडियाचे संस्थापक अध्यक्ष संदीप काळे यांच्यासह महाराष्ट्रातील विविध ठिकाणाहून आलेले पदाधिकारी आणि संघटनेचे सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# शहरातील प्रलंबित प्रश्नांची तड लावा : जाखडी

**नायक वृत्तसेवा, संगमनेर**

गेल्या अनेक महिन्यांपासून संगमनेर शहरातील स्वच्छता, रस्ते आणि सुरक्षा याविषयीचे अनेक प्रश्न प्रलंबित आहेत. परिणामी या समस्यांच्या जंजाळात संगमनेरकर अडकले असून नियमितपणे कर भरूनही विविध समस्यांचा सामना शहरवासीयांना करावा लागत आहे. पालिकेला भरघोस उत्पन्न देणाऱ्या संगमनेरकरांनी हा अन्याय का म्हणून सहन करावा? असा प्रश्न पुरोहित प्रतिष्ठानचे अध्यक्ष भाऊ जाखडी यांनी उपस्थित करत शहरातील प्रलंबित प्रश्नांची तड लावावी अशी मागणी केली आहे.

संगमनेर शहराच्या गंभीर स्वरूप धारण करणाऱ्या या समस्यांच्या सोडवणूकीसाठी गांभीर्याने व तत्परतेने लक्ष घालावे असेही त्यांनी म्हटले आहे. यंदा मे महिन्यातच पावसाळा सुरू



झाला आहे. सलामीच्या अवकाळी पावसाने दर्जाहीन आणि खराब रस्त्यांचे पितळ उघडे पाडले आहे. अनेक रस्त्यांची दुरावस्था कित्येक महिन्यांपासून तशीच आहे. संगमनेरकरांचे हाल होत आहेत.

बीएड कॉलेज, श्रमिक मंगल कार्यालय, सोनांबेकर सुपर स्पेशलिटी रुग्णालय, श्री विठ्ठल मंदिर परिसर आदी भागातील रस्त्यांची अवस्था अतिशय दयनीय झालेली आहे. त्याप्रमाणेच नवीन नगर रोड, स्व. ओंकारनाथ मालपाणी मार्ग, दशक्रिया विधीच्या शांतीघाटा समोरचा रस्ता यासह शहरातील अनेक रस्त्यांची अक्षरशः वाट लागली आहे. वाहन चालवताना मोठा धोका पत्करून वाहन चालकांना वाहने चालावी लागत आहेत. दोन अडीच महिन्यांपासून सातत्याने सर्व स्तरांवर पाठपुरावा करून देखील शासकीय यंत्रणा शुद्ध हरपल्या गत हलायला तयार नाही. त्यामुळे संगमनेरकरांमध्ये संताप निर्माण झाला आहे. सर्व बाजूंनी संगमनेरकरांची अवहेलना होत आहे.

अनेक विकास कामे झालेली आहेत, त्याबद्दल अभिनंदन परंतु राहिलेली कामे नियोजित वेळेत पूर्ण होणार का? पुलाला तीन वर्षे होतील तरी म्हाळुंगी पुलाचे अजून उद्घाटन नाही. शहर परिसरातील अपुरे रस्ते, विकास कामातून संगमनेर साठी काय? ते ही जाहीर करावे असेही भाऊ जाखाडी यांनी म्हटले आहे.

नायक ANCHOR

# तंत्रज्ञानाचा वापर केल्यास ऊस उत्पादनात वाढ : सुरेश माने



**नायक वृत्तसेवा, धांदरफळ**

माजी मंत्री बाळासाहेब थोरात यांच्या नेतृत्वाखाली सहकार महर्षी भाऊसाहेब थोरात सहकारी साखर कारखान्याने कायम शेतकरी, सभासद, उत्पादक यांचे हित जोपासले आहे. कारखान्याने सातत्याने विविध योजना राबविल्या असून एकरी उत्पादन वाढविण्यासाठी नवीन तंत्रज्ञानाचा व शास्त्रीय पद्धतीचा अवलंब केल्यास प्रत्येक शेतकऱ्याला नक्की लाभ होईल असा विश्वास ऊस तज्ञ सुरेश माने यांनी व्यक्त केला. याचबरोबर हुमणी, भुंगेरे यांचा प्रादुर्भाव जून महिन्यात कमी करता येईल असेही त्यांनी सांगितले.

सहकार महर्षी भाऊसाहेब थोरात सहकारी साखर कारखान्याच्या वतीने तालुक्यातील निमगाव बुद्रुक, धांदरफळ, पेमगिरी येथे आयोजित ऊस विकास मेळाव्यात ते बोलत होते. यावेळी व्यासपीठावर अॅड.माधव कानवडे, व्हा. चेअरमन पांडुरंग घुले, संचालक विनोद हासे, नवनाथ आरगडे, रावसाहेब डुबे, रोहिदास पवार, कार्यकारी संचालक जगन्नाथ घुगरकर, कृषी अधिकारी भाऊसाहेब खर्डे, बाळासाहेब सोनवणे आदींसह शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी बोलताना सुरेश माने म्हणाले की, उसावर वाढलेला हुमणी अळीचा प्रादुर्भाव आपल्याला मे आणि जून महिन्यामध्ये जास्त प्रमाणात कमी करता येतो. या काळामध्ये हुमणीचे भुंगेरे बाहेर पडतात आणि ते शास्त्रशुद्ध पद्धतीने आपण अडकवले तर ते नक्की आपण कमी करू शकतो, यासाठी कारखान्याने विविध उपाय योजना शेतकऱ्यांना दिल्या आहेत.

जास्त उत्पादन काढण्यासाठी जास्त पाणी न वापरता ठिबक सिंचनचा वापर केला आणि सेंद्रिय द्रव बरोबर उसामधील अंतर हे अत्यंत महत्त्वाचे आहे.

माधव कानवडे म्हणाले की, ऊस हे

- सर्व शेतकरी जूनमध्ये लागवड करतात आणि मग ऊस तोडी साठी एकाच वेळी सर्व ऊस येतो, म्हणून टप्प्याटप्प्याने ऊस लागवड केल्यास ऊस तोडणी सुद्धा त्या पद्धतीने येईल. ऊस क्षेत्रामध्ये ए आय चार वापर करणे शक्य असून यामुळे खताचा व पाण्याचा कधी वापर करायचा याची माहिती मिळणार असल्याचे माने यांनी सांगितले.

शाश्वत पीक आहे. शेतकऱ्यांनी पारंपारिक पद्धतीने ऊस पिक घेण्याऐवजी त्यामध्ये अत्याधुनिक पद्धतींचा वापर केला पाहिजे.

व्हा.चेअरमन पांडुरंग घुले म्हणाले की, ऊस वाढ विकास योजनेअंतर्गत शेतकऱ्यांसाठी कारखान्याच्या वतीने विविध योजनांचे आयोजन करण्यात आले असून याचा सर्वांनी लाभ घ्यावा असे आवाहन त्यांनी केले. प्रास्ताविक कृषी अधिकारी भाऊसाहेब खर्डे यांनी केले तर बाळासाहेब सोनवणे यांनी आभार मानले. यावेळी परिसरातील शेतकरी, ऊस उत्पादक मोठ्या संख्येने उपस्थित होते.







स्वास्थ्य रक्षणाय् रोग परिशमनाय्
KH
कुटे हॉस्पिटल अॅण्ड लॅप्रोस्कोपी सेंटर
४० फुटी डी. पी. रोड, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर
फोन : (०२४२५) २२६६८८, २२६६८६
डॉ.सोनाली प्र. कुटे (M.B.B.S., D.A.) Physician & Anaesthetists Reg.No. 2005/093398
डॉ.प्रदीप भा. कुटे (M.S., Shalya) Laproscopic Surge & Endoscopist Reg.No. I-45801-A
● मॉड्युलर ऑपरेशन थिएटर ● एसी/डिलक्स रुम्स् ● महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजना उपलब्ध ● तज्ज्ञ डॉक्टर्स व प्रशिक्षित स्टाफ ● डायलेसिस विभाग ● इन्टरकॉम, टीव्ही ● ९ बेडस्चा सुसज्ञ आय.सी.यु. विभाग व सुसज्ञ अपघात विभाग ● नर्स कॉल बेल सिस्टिम ● गरम पाण्यासाठी सोलर ● सेंट्रल ऑक्सिजन व सक्शन ● सर्व प्रकारच्या शस्त्रक्रिया ● सर्व प्रकारचे मेडिक्लेम व कॅशलेस सुविधा उपलब्ध ● अत्याधुनिक सुविधा ● अॅम्ब्युलन्स व २४ तास अत्यावश्यक सेवा ८८८ ८८८ २२२५